# मराठी न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल


बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# महापालिकेच्या उत्पन्न वाढीसह शहर प्रदूषणमुक्तीवर भर

## स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांची माहिती, पहिल्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मान्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेची आर्थिक स्थिती भक्कम करण्यासोबतच शहराच्या शाश्वत विकासासाठी 'इन्कम जनरेशन' आणि 'प्रदूषण नियंत्रण' या दोन सूत्रांवर भर दिला जाणार असल्याची माहिती स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी आज दिली. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात आज स्थायी समितीची सभा पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी अभिषेक बारणे होते. या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर,नगरसचिव मुकेश कोळप , अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते. स्थायी समितीच्या बैठकीत विविध विषयांना मंजुरी देण्यात आल्याची माहिती बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत सभापती अभिषेक बारणे यांनी दिली. स्थायी समिती सभापती दालनात प्रशासकीय कामकाजाबाबत सविस्तर भूमिका मांडताना ते बोलत होते. बैठकीत मनपाच्या मुख्य लेखा विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जाला मंजुरी देण्यात आली. तसेच, महापालिकेच्या वतीने "मराठी भाषा गौरव दिना" निमित्त दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमासाठी

( उर्वरित पान 2 वर )



### महापालिकेच्या उत्पन्न वाढीवर लक्ष; कर्जमुक्तीकडे वाटचाल

**» महापालिकेच्या आर्थिक नियोजनाबाबत बोलताना अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले की, सध्या पालिकेवर दायित्व (Liability) अधिक आहे. "नवीन कामांपेक्षा आधीचे प्रकल्प पूर्ण करणे आणि पालिकेचे उत्पन्न वाढवणे हे आमचे प्राधान्य आहे. वाकडसह उपनगरांतील कर संकलन वाढवणे आणि होर्डिंगजच्या माध्यमातून महसुलात भर टाकणे यावर आम्ही भर देत आहोत. निधी वाढल्यास शहराच्या वैभवात भर घालणारी कामे वेगाने होतील," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच, महापालिकेवर असलेले कर्ज कमी करून शहर कर्जमुक्त करण्याच्या दिशेने सकारात्मक प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.**

### प्रदूषणमुक्तीसाठी 'ॲक्शन प्लॅन'

**» शहरात सुरू असलेल्या बांधकामांच्या ठिकाणी सुरक्षेचे नियम धाब्यावर बसवले जात असल्याच्या तक्रारींची दखल घेत सभापती अभिषेक बारणे यांनी कडक पावले उचलली आहेत. "शहरात धुळीचे प्रमाण वाढू नये आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ नये, यासाठी बांधकाम सुरक्षा (Safety) तपासण्यासाठी दोन विशेष पथके तैनात करण्याचे आदेश दिले आहेत. क्षेत्रीय कार्यालयांनी त्यांच्या हद्दीतील मोठ्या कामांची प्रगती आणि सुरक्षिततेची नियमित देखरेख करावी," असे निर्देश सभापती बारणे यांनी बैठकीत दिले.**

# पिंपरी-चिंचवडमध्ये 7 व 8 मार्चला 'अटल महाआरोग्य शिबिर' : आमदार शंकर जगताप

## लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या 63 व्या जयंतीनिमित्त आयोजन, सांगवीतील पीडब्ल्यूडी मैदानावर 'आरोग्य यज्ञ'

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकनेते आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या ६३ व्या जयंतीनिमित्त पिंपरी-चिंचवड येथे ११ व्या 'अटल विनामूल्य महाआरोग्य शिबिरा'चे आयोजन करण्यात आले आहे. ७ आणि ८ मार्च २०२६ रोजी नवी सांगवी येथील पीडब्ल्यूडी मैदानावर हे शिबिर होणार असून, महाराष्ट्रातील नामवंत रुग्णालये आणि तज्ज्ञ डॉक्टर सहभागी होणार आहेत. अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली.

आमदार शंकर जगताप यांनी याबाबत माहिती दिली. या शिबिराचे उद्घाटन सकाळी १० वाजता होईल. सायंकाळी ५ वाजेपर्यंत रुग्णांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत. 'लक्ष्मणभाऊंचा वारसा रुग्णसेवेचा, संकल्प जनतेच्या निरोगी आयुष्याचा' हे ब्रीद समोर ठेवून शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. या महाआरोग्य शिबिरात साध्या तपासणीपासून ते जटिल शस्त्रक्रियांपर्यंतच्या मार्गदर्शनाबाबत सुविधा उपलब्ध आहेत. हृदयरोगांसाठी एन्जोप्लास्टी, हृदयाच्या झडपांची शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांच्या हृदयातील छिद्रावर शस्त्रक्रिया केली जाणार आहे. कॅन्सर तपासणी, केमोथेरपी व रेडिएशनबाबत मार्गदर्शन दिले जाईल. गुडघे व खुबा प्रत्यारोपण, मोतीबिंदू, प्लास्टिक सर्जरी आणि मणक्याचे आजार यांवरील शस्त्रक्रियाही केल्या जाणार आहेत. एमआरआय, सिटी स्कॅन, मॅमोग्राफी, सोनोग्राफी व डायलिसिस यांसारख्या तपासण्या उपलब्ध राहतील. तसेच फिजिओथेरपी, आयुर्वेदिक उपचार, पंचकर्म, होमिओपॅथी आणि मोफत औषध वाटपाची सुविधा देण्यात येणार आहे.




> **"लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप यांनी राजकारणापलीकडे जाऊन समाजकारणाला आणि त्यातही प्रामुख्याने रुग्णसेवेला महत्व दिले. 'अटल महाआरोग्य शिबिर' केवळ उपक्रम नसून, हा एक पवित्र सेवायज्ञ आहे. ज्या गोरगरीब रुग्णांना मोठ्या रुग्णालयातील खर्च पेलवत नाही, त्यांना एकाच छताखाली तज्ज्ञ डॉक्टर्स आणि मोफत शस्त्रक्रिया मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, हीच भाऊंना खरी श्रद्धांजली आहे. यावर्षी आम्ही तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक अचूक तपासण्यांवर भर दिला आहे." यात नामांकित रुग्णालय, डॉक्टर सहभागी होणार आहे.**
>
> - शंकर जगताप, आमदार, पिंपरी चिंचवड शहर

### शहरातील नामांकित रुग्णालयांचा सहभाग

**» शहरातील ७० हून अधिक रुग्णालयांचा सहभाग या शिबिरात असणार आहे. यात वायसीएम, ससून सर्वोपचार रुग्णालय, आदित्य बिर्ला मेमोरियल रुग्णालय, जहांगीर रुग्णालय, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, रुबी हॉल क्लिनिक, सह्याद्री रुग्णालये आणि डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय यांसारख्या नामांकित संस्थांचा समावेश आहे. शिबिरात सहभागी होणाऱ्या नागरिकांनी ओळख व पत्त्याचा पुरावा म्हणून आधार कार्ड, रेशन कार्ड किंवा मतदान ओळखपत्र तसेच जुने वैद्यकीय अहवाल सोबत आणावेत, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. अधिक माहितीसाठी ७७७५९८११११ किंवा ९८५०१७११११ या क्रमांकांवर संपर्क साधता येईल.**

# घोषणांची प्रभावी अंमलबजावणी करा..!

## अणणाभाऊ साठे महामंडळ आणि जैन अल्पसंख्याक महामंडळाच्या निधीसाठी आमदार अमित गोरखे सरसावले

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधान परिषदेचे आमदार अमित गोरखे यांनी आक्रमक पवित्रा घेत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळाची प्रलंबित कामे, शिक्षक भरतीमधील दिरंगाई आणि विविध समाजांच्या न्याय्य हक्कांच्या मुद्द्यांवरून सरकारला धारेवर धरले. केवळ घोषणा नको तर ठोस अंमलबजावणी हवी, अशा शब्दांत त्यांनी सरकारकडे मागणी केली.

'जैन अल्पसंख्याक महामंडळ' फक्त कागदावरच?

राज्य सरकारने 'जैन अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाची' घोषणा केली, मात्र अद्याप निधी न मिळाल्याने हे महामंडळ केवळ कागदावरच असल्याचे गोरखे यांनी निदर्शनास आणून दिले. समाजातील तरुण मदतीची वाट पाहत असून, सरकारने केवळ घोषणाबाजी न करता ठोस निधी द्यावा, अशी आग्रही मागणी त्यांनी केली.

दिव्यांग बांधवांच्या हक्कासाठी लाक्षणिक मागणी

दिव्यांग बांधवांच्या रखडलेल्या योजनांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी गोरखे यांनी सहा हजार रुपयांची लाक्षणिक पुरवणी मागणी सादर केली. हा प्रश्न रकमेचा नसून दिव्यांगांच्या हक्काचा, सन्मानाचा आणि स्वतंत्र निधी तरतुदीचा आहे, असे ते यावेळी म्हणाले.



### आमदार अमित गोरखे यांची भूमिका..

» सरकारने विविध महामंडळांच्या आणि भरतीच्या केवळ घोषणा केल्या आहेत. जोपर्यंत निधी मिळत नाही आणि अंमलबजावणी होत नाही, तोपर्यंत सामान्यांना न्याय मिळणार नाही. ही सर्व कामे तातडीने मार्गी लागावीत हीच आमची भूमिका आहे

### महामंडळासाठी 'खंड हमी' द्या!

» आमदार अमित गोरखे यांनी मातंग समाजाच्या आर्थिक विकासासाठी महत्त्वाच्या असलेल्या अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचा मुद्दा प्रकर्षाने मांडला. महामंडळाची पाच वर्षांची खंड हमी संपली असल्याने ती तात्काळ देण्यात यावी आणि महामंडळाच्या कामांसाठी स्वतंत्र १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करावी, अशी मागणी त्यांनी केली. तसेच 'आर्टी' संस्थेसाठी २०० कोटींची गरज असताना केवळ १० कोटी दिल्याने त्यांनी नाराजी व्यक्त करत, उर्वरित १९० कोटी रुपये तात्काळ मंजूर करण्याची मागणी केली.

### डीएड पदवीधरांचे भविष्य अंधारात

» राज्यातील हजारो डीएड पदवीधारकांच्या बेरोजगारीकडे लक्ष वेधताना अमित गोरखे म्हणाले की, पवित्र पोर्टलच्या संथ कारभारामुळे शिक्षक भरती रखडली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून तरुणांचे भविष्य टांगणीला लागले आहे. शिक्षक भरती तात्काळ पूर्ण करणे, तसेच कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद न करणे आणि शालेय पोषण आहाराचा दर्जा सुधारण्यासाठी पुरेसा निधी देणे, या मागण्यांसाठी त्यांनी सरकारकडे पाठपुरावा केला. शालेय शिक्षण विभागासाठी त्यांनी लाक्षणिक मागणी मांडून सरकारचे लक्ष वेधले.

# निगडी ते आकुर्डी मार्गावर महामेट्रोच्या कामामुळे नागरिक त्रस्त

## रस्त्याची दुरुस्ती तातडीने करावी; मनसेकडून 'चक्का जाम'चा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील निगडी सिग्नल ते चिंचवड स्टेशन या मुख्य मार्गावर सुरू असलेल्या महामेट्रोच्या कामामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार पुढे आली आहे. गेल्या एक ते दीड वर्षांपासून सुरू असलेल्या या कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून अनेक लहान-मोठे अपघात घडत आहेत. या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा २५ मार्च रोजी निगडी सिग्नल येथे मनसेच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिला आहे.





निगडी सिग्नल ते आकुर्डी दरम्यानचा रस्ता हा शहरातील अत्यंत वर्दळीचा मार्ग मानला जातो. या मार्गावरून दररोज हजारो प्रवासी तसेच मोठी आणि लहान वाहने ये-जा करतात. मात्र, महामेट्रोच्या कामामुळे रस्त्याची अवस्था बिकट झाली असून नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. याबाबत मनसेचे पिंपरी-चिंचवड अध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन चिखले यांनी महापालिका आयुक्तांकडे निवेदन दिले आहे

"महामेट्रोकडे मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध असतानाही कामाकडे दुर्लक्ष केले जात आहे. यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे," असे त्यांनी नमूद केले. तसेच श्रीकृष्ण मंदिर परिसरातील रस्ता गेल्या एक वर्षापासून खोदून ठेवला असून तेथे कोणतेही काम झाले नसल्याचीही तक्रार त्यांनी केली. रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा २५ मार्च रोजी निगडी सिग्नल येथे मनसेच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे

गेल्या एक ते दीड वर्षांपासून सुरू असलेल्या या कामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असून अनेक लहान-मोठे अपघात घडत आहेत. या रस्त्याचे तातडीने डांबरीकरण करून नागरिकांना दिलासा द्यावा, अन्यथा २५ मार्च रोजी निगडी सिग्नल येथे मनसेच्या वतीने चक्का जाम आंदोलन करण्यात येईल, असा इशारा मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले यांनी दिला आहे.

# महापालिकेच्या उत्पन्न वाढीसह शहर प्रदूषणमुक्तीवर भर

(पान 1 वरून)

यामध्ये कलाकार, वक्ते मानधन, सांस्कृतिक कार्यक्रम असा एकूण खर्च र. रु. ७,५०,०००/- (अक्षरी र.रु. सात लाख पन्नास हजार फक्त) इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे

महापालिकेच्या ठेवींबाबत भाष्य करताना अभिषेक बारणे यांनी सांगितले की, "महापालिकेच्या आवश्यक ठेवींमध्ये कोणतीही घट झालेली नाही. त्या पूर्णपणे सुरक्षित आहेत. तरीही, या आरोपांची सविस्तर माहिती घेऊन योग्य ती चौकशी केली जाईल." अत्यावश्यक नसलेली नवीन कामे तूर्तास थांबवून केवळ गरजेच्या कामांनाच प्राधान्य दिले जाणार आहे. आजच्या सभेत प्रलंबित राहिलेल्या विषयांवर आणि विविध उपसूचनांवर पुढील तहकूब सभेत सविस्तर चर्चा करून निर्णय घेतला जाईल. कोणत्या विभागाने किती कामे केली आणि कोणती प्रलंबित ठेवली, याचा 'प्रोग्रेस रिपोर्ट'ही संबंधित अधिकारी यांच्याकडे मागविला असल्याचे त्यांनी सांगितले.

### संकेतस्थळावर पारदर्शकतेचा अभाव

» पदाधिकाऱ्यांच्या वाहन भाड्याबाबत होणाऱ्या चर्चेवर स्पष्टीकरण देताना सभापती अभिषेक बारणे म्हणाले की, "चालकांची कमतरता असल्याने भाडेतत्त्वावर गाड्या घेण्याचे जुने धोरण आहे. मात्र, सव्वा लाख रुपये महिना यांसारख्या मोठ्या बिलांची आणि दरांची आम्ही पुन्हा शहानिशा करणार आहोत. इंधन, चालक आणि देखभाल यासह वाजवी दरात सेवा मिळावी, यासाठी खर्चात कपात करण्याचे आमचे धोरण आहे." त्यानुसार पदाधिकारी स्वेच्छेनुसार त्यांना दरमहा ५० हजार रुपये खर्च देण्याबाबत विचार विनिमय सुरु आहे. तसेच, प्रत्येक विभागाच्या कामाचा आढावा घेऊनच बिले अदा केली जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# पुणे महापालिकेचा 13 हजार कोटींचा विकासाभिमुख अर्थसंकल्प लवकरच

## आयुक्त नवल किशोर राम 9 मार्च रोजी 2026-27 या वर्षाचा अर्थसंकल्प स्थायी समितीसमोर मांडतील.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचा २०२६-२७ या आर्थिक वर्षाचा बहुचर्चित अर्थसंकल्प येत्या सोमवारी (९ मार्चला) सादर केला जाणार आहे. महापालिका आयुक्त नवल किशोर राम स्थायी समितीसमोर अर्थसंकल्प सादर करणार असून हा अर्थसंकल्प किती कोटींचा असेल तसेच यामध्ये कशावर भर असणार आहे? याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

महापालिकेत गेले चार वर्षापासून असलेले प्रशासकराज संपुष्टात येऊन नवीन सभागृह अस्तित्वात आले आहे. त्यामुळे महापालिका प्रशासनाला स्थायी समितीसमोर अंदाजित अर्थसंकल्प सादर करावा लागणार आहे. आयुक्तांनी तयार केलेल्या अर्थसंकल्पाचा अभ्यास करुन त्यामध्ये इतर तरतुदींचा समावेश करुन स्थायी समिती अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी ठेवून त्याला अंतिम मंजुरी घेईल. त्यानंतर त्याची अंमलबजावणी सुरु केली जाईल.

महापालिकेचे सभागृह अस्तित्वात आल्यानंतर महापौर, उपमहापौर, सभागृह नेते, विरोधी पक्षनेते यांची निवड झाली. मात्र




### अर्थसंकल्प ओलांडणार १३ हजार कोटींचा टप्पा ?

» महापालिकेचे तत्कालीन आयुक्त आणि प्रशासक म्हणून काम करणारे राजेंद्र भोसले यांनी मागील वर्षी साडेबारा हजार कोटींचा अर्थसंकल्प सादर केला होता. यंदा यामध्ये आयुक्त नवल किशोर राम वाढ करण्याची शक्यता आहे. त्यानंतर पुन्हा साई समिती देखील यामध्ये काही कोटींनी वाढ करणार असल्याने हा अर्थसंकल्प 13 हजार कोटींच्या पुढे जाणार असल्याचे निश्चित झाले आहे.

महापालिकेच्या तिजोरीच्या चाव्या हातात असलेल्या स्थायी समितीची निवडणूक न झाल्याने अर्थसंकल्प सादर करण्यासाठी काही दिवस विलंब झाला. गेल्या महिन्यात स्थायी समिती अध्यक्षपदी भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक श्रीनाथ भिमाले यांची निवड झाली असून स्थायी समितीच्या दोन बैठका देखील झाल्या आहेत. त्यामुळे आयुक्त नवल किशोर राम २०२६-२७ वर्षासाठीचा अर्थसंकल्प कधी सादर करणार, याबाबत उत्सुकता होती.

स्थायी समितीसमोर अर्थसंकल्प सादर करण्यासाठी ९ मार्च हा दिवस निश्चित करण्यात आला आहे. त्यानुसार महापालिका प्रशासनाने नगरसचिव कार्यालयाला पत्र पाठविले आहे. सोमवारी (२ मार्चला) नगरसचिव कार्यालयाकडे अर्थसंकल्प सादर करण्याचे पत्र पाठविण्यात आले आहे. त्यानुसार ९ मार्चला दुपारनंतर स्थायी समितीची विशेष बैठक होणार असून त्यामध्ये आयुक्त राम अर्थसंकल्प मांडणार आहेत.

महापालिकेच्या विविध विभागांकडून खर्चाची माहिती घेऊन पालिका आयुक्तांनी १५ जानेवारी पर्यंत अर्थसंकल्प तयार करून तो स्थायी समिती समोर मांडावा. त्यानंतर स्थायी समितीने त्याचा अभ्यास करून त्यामध्ये आवश्यक असलेल्या गोष्टींचा समावेश करत हा अर्थसंकल्प सर्वसाधारण सभेत ठेवावा. सर्वसाधारण सभेत अर्थसंकल्प मांडल्यानंतर त्यावर सर्वपक्षीय सभासदांची चर्चा होते. त्यावर आवश्यक त्या उपसूचना देऊन अर्थसंकल्पाला अंतिम मंजुरी दिली जाते. मात्र गेल्या काही वर्षांपासून अर्थसंकल्प ठरवून दिलेल्या मुदतीत मांडण्याची परंपरा विस्कळीत झाली आहे. यंदाच्या वर्षीही पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीमुळे अर्थसंकल्प मांडण्यास उशीर झाल्याचे चित्र आहे.

### स्थायी समितीत चर्चा, नंतर अंतिम मंजुरी

» अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर स्थायी समितीत त्यावर सविस्तर चर्चा होणार आहे. आवश्यक बदल व नव्या योजना समाविष्ट करून तो सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी ठेवला जाईल. स्थायी समिती अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांच्या अध्यक्षतेखाली पुढील प्रक्रिया पार पडणार आहे. मंजुरीनंतर विकासकामांना गती मिळणार आहे.

### ९ मार्चला अर्थसंकल्प सादर

» पुणे महानगरपालिकाचा २०२६-२७ चा अर्थसंकल्प ९ मार्च रोजी स्थायी समितीसमोर सादर होणार आहे. आयुक्त नवल किशोर राम अंदाजपत्रक मांडणार असून प्रशासकराजानंतरचे हे पहिलेच बजेट असल्याने उत्सुकता वाढली आहे. विविध विभागांकडून माहिती घेऊन तयार केलेल्या या अर्थसंकल्पात विकासकामे, पायाभूत सुविधा आणि नागरिकांसाठीच्या सेवांवर भर अपेक्षित आहे.

# दुबई येथून 111 नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले; उर्वरित नागरिकांना आणण्याची कार्यवाही सुरु

## 54 नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरू आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली

**पुणे | प्रतिनिधी**

मध्यपूर्व व आसपासच्या काही देशांमध्ये निर्माण झालेल्या तणावपूर्ण प्रादेशिक परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर दुबई येथे अडकलेल्या जिल्ह्यातील एकूण १८४ नागरिकांपैकी १११ नागरिक पुण्यात सुखरूप पोहोचले आहेत. तसेच १९ नागरिकांच्या विमान उड्डाणाची वेळ बदलण्यात आली असून ५४ नागरिकांना परत आणण्याची प्रक्रिया सुरु आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.



अशा परिस्थितीत नागरिकांनी आवश्यक माहितीसाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा. पॅलेस्टाईन (रामल्लाह), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवेत, बहारीन, मस्कत, जॉर्डन तसेच संयुक्त अरब अमिरात (अबूधाबी) येथे वास्तव्यास असलेल्या सर्व भारतीय नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, अनावश्यक हालचाली टाळाव्यात व स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांनी दिलेल्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन शासनाच्या वतीने वेळोवेळी करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४x७ हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले असून, दूतावासांकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे.

आवश्यक असल्यास तात्काळ भारतीय दूतावासांशी संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र शासनाने केले आहे. केंद्र सरकार व संबंधित दूतावासांशी समन्वय ठेवून, महाराष्ट्र शासनाच्या वतीने नागरिकांच्या सुरक्षेबाबत सतर्कता बाळगली जात आहे.

त्यानुसार पॅलेस्टाईन (रामल्लाह) येथे फोन : +९७०-५९२९१६४१८, ई-मेल : REPOFFICE@MEA.GOV.IN/ CONS.RAMALLAH@MEA.GOV.IN कतार (दोहा) येथे फोन : ००९७४-५५६४७५०२, ई-मेल : CONS.DOHA@MEA.GOV.IN सौदी अरेबिया (रियाध) येथे फोन : ००-९६६-११-४८८४६९७, व्हॉट्सअ‍ॅप : ००-९६६-५४२१२६७४८, टोल फ्री : ८००-२४७-१२३४, ई-मेल : CW.RIYADH@MEA.GOV.IN इस्रायल (तेल अवीव) येथे फोन : +९७२-५४-७५२०७११/ +९७२-५४-२४२८३७८, ई-मेल : CONS1.TELAVIV@MEA.GOV.IN इराण (तेहरान) येथे फोन : +९८९१२८१०९११५, +९८९१२८१०९१०९, +९८९१२८१०९१०२, +९८९९३२१७९३५९, संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी / दुबई) येथे टोल फ्री : ८००-४६३४२, व्हॉट्सअ‍ॅप : +९७१५४३०९०५७१, ई-मेल : PBSK.DUBAI@MEA.GOV.IN / CA.ABUDHABI@MEA.GOV.IN कुवेत येथे फोन : +९६५६५५०११४६, ई-मेल : COMMUNITY.KUWAIT@MEA.GOV.IN बहरीन येथे फोन : ००९७३-३९४१८०७१, मस्कत येथे टोल फ्री : ८००७१२३४, व्हॉट्सअ‍ॅप : +९६८९८२८२२७०, ई-मेल : CW.MUSCAT@MEA.GOV.IN/ CONS.MUSCAT@MEA.GOV.IN जॉर्डन येथे फोन : ००९६२-७७० ४२२ २७६ आणि इराक (बगदाद) येथे फोन : +९६४ ७७१ ६५१ ११८५ / +९६४ ७७०४४४ ४८९९, वेबसाईट : HTTPS://WWW.EOIBAGHDAD.GOV.IN/ तसेच ई-मेल : CONS.BAGHDAD@MEA.GOV.IN/ CONS1.BAGHDAD@MEA.GOV.IN/ POL.BAGHDAD@MEA.GOV.IN, HTTPS://X.COM/I/

# युद्धामुळे पुण्यातील उद्योग क्षेत्रावर परिणामाची शक्यता

## एमसीसीआयए सर्वेक्षणात 47% उद्योगांना फटका; कच्च्या मालाच्या किमती वाढीची भीती

**पुणे | प्रतिनिधी**

अमेरिका-इस्रायल आणि इराणमध्ये सुरू असलेल्या युद्धाची झळ पुण्यातील उद्योगांनाही बसणार आहे. पुण्यातील ४७ टक्के उद्योगांवर या युद्धाचा परिणाम होणार असून, त्यात २१.२ टक्के उद्योगांवर तीव्र आणि २५.८ टक्के उद्योगांवर सौम्य परिणाम होणार असल्याचे 'मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर'ने (एमसीसीआयए) केलेल्या ताज्या सर्वेक्षणातून समोर आले आहे.

'एमसीसीआयए'ने सध्या सुरू असलेल्या युद्धाचा व्यवसायावर होणारा परिणाम जाणून घेण्यासाठी पुण्यातील ६८ कंपन्यांचे सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणात युद्धाचा तीव्र नकारात्मक परिणाम होणार असल्याचे मत २१.२ टक्के उद्योगांनी नोंदविले. याच वेळी युद्धाचा सौम्य नकारात्मक परिणाम जाणवणार असल्याचे २५.८ टक्के उद्योगांनी सांगितले. युद्धाचा कोणताही परिणाम होणार नाही, असे ४१ टक्के उद्योगांचे मत आहे. युद्धाचा सकारात्मक परिणाम होणार असल्याचे मत ६ टक्के उद्योगांनी नोंदविले आहे. त्यामध्ये ३ टक्के उद्योगांवर सौम्य सकारात्मक आणि ३ जास्त सकारात्मक परिणाम होईल, असे म्हटले आहे.



आखातातील जलवाहतूक ठप्प झाल्यास इंधन आणि इतर वस्तूंच्या आयात व निर्यातीवर परिणाम होणार आहे. याचबरोबर पॉलिमरसह इतर प्रकारच्या कच्च्या मालाच्या किमतीत पुढील २ ते ३ दिवसांत १० टक्के वाढ अपेक्षित आहे. त्यामुळे जुन्या दराने आधीचे कार्यादेश पूर्ण करणे शक्य होणार नाही. त्यामुळे त्यांचा उद्योगांवर तीव्र नकारात्मक परिणाम होईल.

'युद्धाचा परिणाम काही काळानंतर जाणवेल. त्याचे मूल्यमापन आताच करणे शक्य होणार नाही. काही ठिकाणी जलवाहतुकीत अडथळा निर्माण झाला असल्याने मालवाहतुकीवर आगामी काळात परिणाम दिसून येईल. सध्या असलेला कच्चा माल कमी झाल्यानंतर उत्पादक कंपन्यांना आधी झालेल्या कार्यादेशांचे पालन करणे अवघड बनेल,' असेही निरीक्षण उद्योगांनी या सर्वेक्षणात नोंदविले.

तात्पुरती अनिश्चितता

'पुण्यातील काही उद्योजकांशी आमची चर्चा झाली. अगदी सर्वांनाच नव्हे. पण, काही उद्योगांना या उद्योगाचा नक्कीच फटका जाणवत आहे. सध्या अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या पुरवठ्याला धोका निर्माण झाला आहे. पेट्रोल-डिझेलसह पॉलिमर (प्लास्टिक) उत्पादनासाठी लागणारा पेट्रोकेमिकलचा कच्चा माल महाग होत आहे. आपल्या निर्यातीमध्ये मोठा भाग खाडी मार्गाने जात असल्याने आणि दुबईसारख्या बंदरावर अवलंबून असल्याने तात्पुरती अनिश्चितता जाणवणे स्वाभाविक आहे. हा संघर्ष निवळेल आणि परिस्थिती लवकर स्थिर होईल,' अशी आशा 'एमसीसीआयए'चे महासंचालक प्रशांत गिरबने यांनी सांगितले.

### कच्च्या मालाच्या किमती वाढण्याची शक्यता

**» आखातातील जलवाहतुकीत अडथळे आल्यास इंधन व पेट्रोकेमिकल कच्च्या मालाच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. पॉलिमरसह विविध कच्च्या मालाच्या किमतीत १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता उद्योगांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे जुन्या दरातील कार्यादेश पूर्ण करणे कठीण होणार असल्याची चिंता आहे.**

### ४७ टक्के उद्योगांवर परिणाम

**» मराठा चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रिकल्चर (एमसीसीआयए)च्या सर्वेक्षणानुसार अमेरिका-इस्रायल आणि इराण संघर्षाचा पुण्यातील ४७ टक्के उद्योगांवर परिणाम होणार आहे. त्यापैकी २१.२ टक्के उद्योगांनी तीव्र नकारात्मक परिणामाची शक्यता व्यक्त केली, तर २५.८ टक्के उद्योगांना सौम्य परिणाम जाणवेल असे म्हटले आहे. ४१ टक्के उद्योगांनी कोणताही परिणाम होणार नसल्याचे नमूद केले.**

### तात्पुरती अनिश्चितता

**» खाडी मार्गावरील निर्यात व आयात साखळी विस्कळीत झाल्यास मालवाहतुकीवर परिणाम दिसू शकतो. कच्चा माल कमी झाल्यानंतर उत्पादनावर ताण येईल, असे उद्योगांचे मत आहे. परिस्थिती लवकर स्थिर होईल, अशी अपेक्षा उद्योग क्षेत्रातून व्यक्त करण्यात येत आहे.**

# आयटी पार्क आता कोंडीमुक्त! वाहतूक पोलिसांसह पीएमपीएमएलचा मोठा निर्णय

## छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फेज 1 दरम्यान नवे बदल; बसथांबे हलवल्याने वाहतूक सुरळीत होण्याची अपेक्षा

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्क परिसरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. विशेषतः सकाळी आणि संध्याकाळी कार्यालयीन वेळेत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागत असून आयटी कर्मचारी आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर हिंजवडी वाहतूक विभागाने वाहतूक सुरळीत करण्यासाठी काही महत्त्वाची पावले उचलली असून अनेक पीएमपीएमएल बसथांबे स्थलांतरित करण्यात आले आहेत.



हिंजवडी आयटी पार्कमध्ये दिवसेंदिवस वाहनांची संख्या वाढत आहे. त्यात तुलनेत रस्ते अपुरे पडू लागले आहेत. त्यामुळे सकाळी आणि संध्याकाळी कार्यालयीन वेळेत मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. आयटी पार्कमधील रस्त्यावर कोंडीचे चित्र नित्याचेच बनले आहे. आता या परिस्थितीत सुधारणा करण्याचे पाऊल पडू लागले आहे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी पीएमपीएमएलच्या काही प्रमुख बसथांब्यांचे स्थान बदलण्यात आले आहे.

यामध्ये सावतमाळी मंदिर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, मेझा-९, टाटा टी-जंक्शन, विप्रो फेज २ सर्कल, पॉवर हाऊस स्टेशन आणि एमआयडीसी सर्कल या बसथांब्यांचा समावेश आहे. या ठिकाणी बस थांबत असल्यामुळे मुख्य रस्त्यावर वाहतुकीचा वेग मंदावत असल्याचे कारण समोर आले होते. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक ते फेज १ सर्कल हा रस्ता एकेरी (वन-वे) करण्यात आल्यानंतर पर्सिस्टंट कंपनीसमोरील बसथांबाही हटवण्यात आला आहे. या बदलामुळे या मार्गावरील वाहतूक अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

हिंजवडी परिसरातील वाढती आयटी कंपन्या आणि कर्मचाऱ्यांची संख्या लक्षात घेता वाहतूक व्यवस्थापन हा मोठा प्रश्न बनला आहे. त्यामुळे बसथांबे स्थलांतर, रस्त्यांचे एकेरीकरण आणि मेट्रो सेवा यांसारख्या उपाययोजनांमुळे भविष्यात वाहतूक कोंडी कमी होईल, अशी अपेक्षा फोरम फोर आयटी एम्प्लॉईज संघटनेने व्यक्त केली आह.

### आणखी बसथांबे स्थलांतरित करणार

**» हिंजवडी वाहतूक पोलीस विभाग आणि पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त प्रयत्नातून वाहतूक व्यवस्थापन सुधारण्यासाठी पुढील काळात आणखी उपाययोजना करण्यात येणार आहेत. विशेषतः मेट्रो सेवा पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यानंतर आणखी काही बसथांबे स्थलांतरित केले जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, वाहतूक कोंडी टाळण्यासाठी नागरिकांनीही सहकार्य करण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. चुकीच्या दिशेने वाहन चालवणे (रॉंग साईड ड्रायव्हिंग) टाळणे, गर्दीच्या चौकांजवळ अनावश्यक पिक-अप आणि ड्रॉप टाळणे तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले आहे.**